**तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ९७/२०२३**
**निशाणी क्र.६१**

**महाराष्ट्र शासन** सरकारी अभियोक्ता
**..वि..**
**अजित दुंडेकर व इतर** आरोपी.

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. ४** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | रुपेश विष्णू नेवारे |
| वय अंदाजे ३५ वर्षे | धंदा- नोकरी, पोलीस वाहन चालक |
| राहणार | भोसा, ता.जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. डाहे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

मी ठाणेदार किशोर जुनघरे यांना ओळखतो. तसेच कैलास लोथे, संदिप मेहत्रे यांना सुध्दा ओळखतो व ते पोलीस कर्मचारी आहे. दिनांक १४/१२/२०२१ रोजी मी पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामीण येथे पोलीस वाहन चालक या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी ठाणेदार किशोर जुनघरे हे होते. किशोर जुनघरे यांना सुगंधीत तंबाखूबाबत माहिती मिळाली. त्यामुळे किशोर जुनघरे यांनी मला पोलीस वाहनामध्ये बसण्यास सांगीतले. त्यानूसार मी, किशोर जुनघरे, पोलीस वाहन चालक विक्की राउत, पोलीस कॉन्सटेबल शुभांगिनी जांभूळकर असे सर्व पोलीस वाहनामध्ये बसलो. त्यानंतर आम्ही जंगदंबा कॉलेज ग्राम किन्ही या गावाजवळ आलो. तेथे आम्हाला ओमणी ॲम्बुलन्स हे वाहन दिसले व ते वाहन यवतमाळवरुन आर्णीकडे जात होते. त्या वाहनाला आम्ही थांबविले. त्या वाहन चालकाला त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अजित दुंडेकर, प्रदिप राठोड व सैय्यद रहेमान असे सांगीतले. त्या वाहनाची आम्ही तपासणी घेतली असता त्यामध्ये बब्बु गोल्ड सुगंधीत तंबाखु आढळून आला. तो तंबाखु पांढ-या रंगाच्या प्लॉस्टीकच्या पोत्यामध्ये मिळून आला. चार पोत्यामध्ये ९६ नग बब्बु गोल्ड तंबाखुच्या पुड्या होत्या व त्याची

मोजणी ठाणेदार श्री जुनघरे यांनी केली. मुददेमाल व तिन व्यक्तींना पोलीस स्टेशनमध्ये आणण्यात आले. त्यानंतर श्री जुनघरे यांनी अन्न सुरक्षा अधिकारी यांना माहिती नाही. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. मी तिन व्यक्तींना ओळखू शकतो. त्या तिन व्यक्तीं पैकी आज न्यायालयामध्ये दोन व्यक्ती हजर आहेत व त्यांची नावे प्रदिप राठोड व दुंडेकर आहेत.

**<u>उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. एन. एन. खिलजी यांचे मार्फत सुरु -</u>**

२. माझे बयान पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. मी कथित घटनेच्यादिवशी कर्तव्यावर असल्याबाबतचे दस्तऐवज मी पोलीसांना दिले नाही. मला वैयक्तीकपणे गुप्त माहिती मिळाली नाही. तसेच जुनघरे साहेबांना कोणी गुप्त माहिती दिली हे सुध्दा मला माहिती नाही. तथाकथित झडतीनंतर मुद्देमाल पोलीस स्टेशनला आणण्यात आला. कथित घटनास्थळावर जातांना पोलीस स्टेशन डायरीमध्ये त्याची नोंद मी घेतली नाही. आम्ही घटनास्थळावर शासकीय वाहनाने गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की शासकीय वाहनाने घटनास्थळावर जातांना त्याची नोंद पोलीस स्टेशन डायरीमध्ये घ्यावी लागते. तशी नोंद मी त्या डायरीमध्ये घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की श्री जुनघरे यांचा वैयक्तीक फोन मला घटनास्थळावर हजर राहण्याबाबत आला नाही. हे म्हणणे खरे नाही की वाहन घटनास्थळावर अगोदरच उभे होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी वर नमूद केलेली घटना आज सांगीतली.

३. हे म्हणणे खरे आहे की कोर्टात आल्यावर मी माझे बयान वाचले व त्यानूसार त्यानंतर मी पुरावा दिला. हे म्हणणे खरे नाही की मी सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या वरिष्ठांच्या

सांगण्यानूसार मी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी त्यादिवशी कर्तव्यावर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की आरोपीची वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर माझा या गुन्हयाशी काहीही संबंध आला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासणीमध्ये सांगीतलेला मजकूर खोटा आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास-काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

(पी.एस.इंगळे)

दिनांक - ०८/०४/२०२६

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.